# Twenty Thousand Leagues Under the Sea
# (समुद्राच्या पृष्ठभागाखाली वीस हजार मैल प्रवास): ज्यूल्स व्हर्न

संक्षिप्त मराठी कथारूप अनुवाद: प्रा. डॉ. बिंदुमाधव जोशी

**प्रास्ताविक:**

ज्यूल्स व्हर्न हा १९ व्या शतकातील (१८२८-१९०५) फ्रेंच-अमेरिकन लेखक. त्याच्याबद्दल फार थोडी माहिती उपलब्ध आहे. दर्यावर्दी जीवन व विज्ञान यांची त्याला आवड व खूप माहिती होती. पाणबुडीचा वापर सुरू होण्यापूर्वी (पहिले महायुद्ध) कित्येक वर्षी आधी त्या कल्पनेवर आधारलेली ही हृदयंगम साहसकथा. मुलांपासून-मोठ्यांपर्यंत सर्वांना आवडेल अशी आहे. ज्यूल्स व्हर्नला विज्ञानकथेचा (science fiction) जनक मानले जाते.

**प्रमुख पात्रे व उपयुक्त माहिती:**

| | |
|---|---|
| कॅप्टन नेमो - | नॉटीलस पाणबुडीचा कप्तान. |
| प्रोफेसर अरोनॉक्स - | पॅरिस नॅचरल म्युझियमचे प्रख्यात संशोधक प्राध्यापक; व्हेल माशांचे तज्ञ. |
| नेडलॅंड - | निष्णात हार्पूनर - व्हेल माशांचा कुशल शिकारी. हार्पून हा व्हेल माशांच्या शिकारीसाठी वापरला जाणारा खास भाला. |
| कन्सेल - | प्रोफेसर अरोनॉक्स यांचा विश्वासू सेवक सहकारी. |
| लीग - | समुद्रातील अंतर मोजण्याचे मैलापेक्षा थोडे मोठे माप. |

**कथानक:**

महासागरातील अनेक ठिकाणी जहाजांनी एक महाभयानक प्राणी प्रखर तेजस्वी प्रकाशाने हिंडताना पाहिला. अनेक जहाजे त्या प्राण्याने बुडवून नष्ट केल्यानंतर जगभर भीतीची लाट पसरली. मच्छिमार व दर्यावर्दी आपल्या नौका समुद्रात घालावयास घाबरू लागले व या प्राण्याचा नाश करावा अशी मागणी जगभर होऊ लागली. अखेरीस अमेरिकेने अब्राहम लिंकन नावाची आपली युद्धनौका यासाठी सिद्ध केली. हा महाभयंकर प्राणी नार्व्हेल असावा असा शोधनिबंध लिहिणारे पॅरिस नॅचरल म्युझियमचे प्राध्यापक अरोनॉक्स यांना मोहिमेचे प्रमुख नेमले जाते. हा प्राणी व्हेल असेल अशा शक्यतेने कुशल भालाईत (हार्पूनर) नेडलॅंड व प्रा. अरोनॉक्सचा सहकारी व सेवक कन्सेल या मोहिमेत सहभागी होतात.

न्यूयॉर्क बंदरातून "अब्राहम लिंकन" या तीन प्रवाशांसह या महाभयंकर प्राण्याला (monster) शोधून नष्ट करण्याच्या मोहिमेवर निघते. बरेच दिवस त्या प्राण्याशी संपर्क होत नाही. आणि एके दिवशी रात्री ...

प्रखर तेजाचा झोत टाकीत तो प्राणी झपाट्याने त्यांच्याजवळ आला. संधी मिळताच नेम धरून नेडलॅंडने आपला भाला त्याच्यावर फेकला, खणण आवाज करून तो भाला पाण्यात पडला.

काहीतरी धातूचे कवच प्राण्याचे रक्षण करत होते. पुढच्याच क्षणाला मोठा स्फोट झाला, नौकेला जोरदार धक्का बसला व तिघेहीजण समुद्रात फेकले गेले. अरोनॉक्स बेशुद्ध झाले. ते शुद्धीवर आले त्यावेळी त्यांना जाणवले की आपण समुद्राखालून जाणाऱ्या नौकेत आहोत. एका खोलीत ते पहुडले होते. थोड्या वेळाने नौकेवरील दोन अधिकारी त्यांना भेटावयास आले. पण त्यांची भाषा न कळल्यामुळे ते निघून गेले. मग जहाजाचा कप्तान नेमो स्वतः आला. त्याने फ्रेंच भाषेत आपली ओळख करून दिली व "नॉटिलस" पाणबुडीवर त्यांचे स्वागत केले. जरी एका दृष्टीने ते पाणबुडीवर बंदिवान होते तरी आतमधे हिंडण्याफिरण्याचे त्यांना पूर्ण स्वातंत्र्य होते. नॉटिलसबद्दल नेमोने काही माहिती त्यांना सांगितली. आतील वीजपुरवठा निर्माण करण्याची यंत्रणा व पाणबुडीमधे लागणारा प्राणवायूचा पुरवठा याबाबतीत नॉटिलस स्वावलंबी होती. आतील अन्न व इतर गरजा संपूर्णपणे सागरातील मासे, प्राणी व सागरतळावरील वनस्पती यांच्यातून पुरवल्या जात होत्या, अगदी सिगारची तंबाखू सुद्धा! जगातील वेगवेगळ्या देशांतून पाणबुडीचे पार्ट आणून ते एका ओसाड बेटावर एकत्रित करून तेथे ही पाणबुडी उभारली गेली होती. ही सर्व आधुनिक व्यवस्था ऐकून अरोनॉक्स अचंबित झाले.

नॉटिलस काही दिवसांनंतर दक्षिण अटलांटिक महासागरातून प्रशांत महासागरात शिरली. एके दिवशी नेमोने जाहीर केले की तो आपल्या सहकाऱ्यांसह महासागराच्या तळावरील क्रेस्पो या जंगलात शिकारीला जाणार आहे; प्रोफेसर व त्यांच्या दोन सहकाऱ्यांनाही त्याने सहभागी होण्याचे आमंत्रण दिले. सागरतळावर चालण्यासाठी, शिकारीसाठी लागणारी सर्व साधने पाणबुडीत होती. बरीच शिकार मिळवून पाणबुडीकडे परत येत असताना एक हिंस्त्र जलचर नेमोवर हल्ला करण्याच्या बेतात असताना नेडलॅंडने त्याला मारून नेमोचे प्राण वाचवले. पुढच्या मोहिमेत सिलोनच्या मोती गोळा करणाऱ्या कारागिरांना मदत करताना एक शार्क नेडलॅंडला भक्ष करण्याच्या बेतात असतो. नेमो त्याला वाचवतो व उपकाराची परतफेड करतो. काही भारतीय पाणबुड्यांनाही नेमो अशीच मदत करतो व त्यांना वाचवतो.

बोर्निओच्या किनाऱ्याला पाणबुडी लागली असताना अरोनॉक्स व नेडलॅंड जमीनीवरील प्राण्यांची शिकार करण्यासाठी जातात. तेथील नरमांसभक्षक रानटी टोळीवाले त्यांच्या पाठीमागे लागतात. त्यांना पळता भुई थोडी होते. धापा टाकत ते पाणबुडीवर कसेबसे चढतात. हल्लेखोरही त्यांच्या पाठोपाठ पाणबुडीवर चढू पाहातात. नेमो त्या दोघांना आत घेतो आणि कठड्यात वीज सुरू करतो. हल्लेखोर कठड्याला (रेलींग) हात लागताच विजेचा धक्का बसून किंचाळत मागे फिरतात व संकट टळते.

त्यानंतर नेमो एके दिवशी जाहीर करतो, "आपण भूमध्य समुद्रात प्रवेश करणार आहोत." त्यावेळी सुएझ कॅनाल तयार झाला नव्हता. अरोनॉक्सला साहजिकच वाटले की तो आफ्रिकेच्या केप ऑफ गुड होपला वळसा घालून जाणार असावा. हा प्रवास खूप लांबचा होता, पण केवळ तीन दिवसांत नेमोने सुएझच्या जमीनीखालून जाणाऱ्या वाटेने भूमध्य समुद्रात प्रवेश केला.

नेमो हुशार, कर्तबगार, दयाळू, शांत, व हरकामी होता. पण अधिकार गाजवण्यात करारी होता. अरोनॉक्सबद्दल त्याला आदर होता, पण त्या तिघांना ते आपले बंदिवान आहेत हे तो वारंवार दाखवून देत होता. त्यामुळे नेडलँड व त्याचे फारसे जमत नव्हते. नेडलँड सुटून जाण्याचा मार्ग शोधत होता. स्पेनला वळसा घालून जाताना तशी संधी आली. पण पाणबुडीने ऐनवेळी मार्ग बदल्याने ते जमले नाही. लाँग आयलँडपाशी अशीच पक्की योजना केली होती, पण वादळ आल्यामुळे तीही सोडून द्यावी लागली. नेमोच्या वागण्यात समाजाबद्दल व मानवजातीबद्दल कमालीचा द्वेष जाणवत होता. मार्गात येणाऱ्या बोटींना तो बिनदिक्कतपणे बुडवत होता व बोटींवरील लोकांच्या बाबतीत तो अजिबात दयामाया दाखवत नव्हता. त्याच्या या वृत्तीचे कारण अरोनॉक्सना उमगत नव्हते. नेमो लहरीही होता. कॅनडाजवळ त्याने एकदम पाणबुडीची दिशा बदलली व दक्षिण ध्रुवाकडे मोर्चा वळवला. त्याच्या लहरीपणामुळे पाणबुडी अंटार्क्टिकाच्या हिमनगामधे अडकली व पाणबुडी व सर्व प्रवाशी नष्ट पावण्याचा धोका निर्माण झाला. पण हटवादीपणा व कमालीचे प्रसंगावधान दाखवून त्याने सुटका करून घेतली. तो काय सिद्ध करू पाहतोय हेच अरोनॉक्सना समजत नव्हते.

पॅसिफिकमधे एका बेटावर पाणबुडीने ५-६ दिवस विश्रांती घेतली. सागरातील भूकंपामुळे वर आलेले ते एक बेट (atoll), त्यावर खनिज तेलाचा प्रचंड साठा होता. नेमोने तेथे इंधनाच्या टाक्या भरून ठेवल्या होत्या. पाणबुडीमधे भरपूर इंधन भरल्यानंतर पुढचा प्रवास सुरू झाला. एकदा सहज पाणबुडीच्या आतील खोल्यांत चक्कर मारताना तीन खोल्यांमधे सोन्याचा भरगच्च साठा अरोनॉक्सना दिसला. त्यांच्या चेहऱ्यावरील प्रश्नांकित आश्चर्याला नेमोने उत्तर दिले नाही, पण आफ्रिकेच्या ३-४ बंदरांमधे पाणबुडी थांबली की तिथले गरीब लोक नेमो भोवती गोळा व्हायचे व ते सोने नेमो त्यांना वाटून द्यायचा. मानवजातीचा द्वेष करणारा नेमो गरीबांबद्दल इतका कळवळा बाळगतो हा विरोधाभास मोठा विलक्षण होता.

वर्षाहून अधिक काळ उलटला. अरोनॉक्स पाणबुडीच्या बंदिस्त जीवनाला कंटाळले. तेही आता होमसिक झाले. नॉर्वेच्या जवळून जात असताना एका युद्धनौकेने पाणबुडीवर हल्ला केला. त्या युद्धनौकेचा विध्वंस करताना व त्यावरील लोकांना मारताना नेमोने इतकी अमानुषता दाखवली की नेडलँडसारखेच अरोनॉक्सही नेमोच्या सहवासाला कंटाळले.

नॉर्वेच्या जवळून जाताना एका चक्रीवादळामधे नॉटिलस खेचली जाते. दरवर्षी अनेक जहाजांना, बोटींना गिळंकृत करणारे ते प्रसिद्ध वादळ असते ...

काय झाले ते अरोनॉक्सना कळत नाही. ते शुद्धीवर येतात तेव्हा ते तिघे प्रवासी नॉर्वेच्या एका बेटावर सुरक्षित फेकले गेलेले दिसतात. आपण सुरक्षित कसे राहिलो ते त्यांना कळत नाही, नॉटिलस व तिच्यावरील खलाशी यांचे काय झाले हेही त्यांना कळत नाही. वादळात बहुतेक सर्व नष्ट झाले असावेत असा ते अंदाज करतात.

अशा प्रकारे सागरातील दडलेली रहस्ये व नेमोसह नॉटिलस पाणबुडी यांचे ते तिघे एकमेव साक्षीदार म्हणून उरतात.

०००००-----०००००

आपल्या प्रतिक्रिया/सूचना कळवाः
Phone: 020-25881194, 98811-49755
Email: joshi.bindumadhav@gmail.com